तरूण भारत

# अर्थव्यवस्थेला गती देणारे संशोधन आवश्यक

## कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी

कोल्हापूर

संशोधन आराखडा व विदासंकलन हे संशोधनाचे हृदय असते. सामाजिक शास्त्रातील व वाणिज्य विषयातील शिक्षकांनी अद्ययावत तंत्रज्ञानाचा संशोधनात वापर करावा. नव्या जगात आता भारतीय अर्थव्यवस्थेला गती देणारे बहुआयामी संशोधन आवश्यक आहे, असे प्रतिपादन कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.



वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागाच्या वतीने आयोजित केलेल्या लघुकालीक कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन होते.

प्र–कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील म्हणाले, युवकांच्या प्रज्ञेची मशागत करण्यासाठी व क्षमता विकसित करण्यासाठी लघुकालीक कार्यक्रमाचे प्रशिक्षण शिक्षकांना दिले पाहिजे. त्यातूनच नवोपक्रम व संशोधन उदयास येते आणि समस्या सोडविण्यास उपयुक्त ठरते. अध्यक्ष्यस्थानावरून डॉ. महाजन म्हणाले, बहुआयामी विषयांचा अभ्यास संशोधनाच्या माध्यमातून करण्यासाठी वाणिज्य, व्यवस्थापन व इतर शिक्षकांच्या क्षमता विकसित करण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले जात आहेत. सामाजिक व आर्थिक समस्या सोडविण्यासाठी व निरंतर विकास ध्येयांची प्राप्ती करण्यासाठी अशा बहुआयामी संशोधनाचा वापर केला पाहिजे. स्वागत व प्रास्ताविक डॉ. ए. एम. गुरव यांनी केले. डॉ. केदार मारुलकर यांनी आभार मानले.

09 FEB 2022 पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अर्थव्यवस्थेला गती देणारे बहुआयामी संशोधन आवश्यक

## कुलगुरू डॉ. शिर्के : वाणिज्य विभागात लघुकालिक कार्यक्रमाचे उद्घाटन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

संशोधन आराखडा व विदासंकलन हे संशोधनाचे हृदय असते. नव्या जगात आता भारतीय अर्थव्यवस्थेला गती देणारे बहुआयामी संशोधन आवश्यक आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागाच्या वतीने आयोजित केलेल्या लघुकालिक कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन होते. याप्रसंगी विशेष अतिथी म्हणून शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील उपस्थित होते. कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, तंत्रज्ञानाचा वापर करण्याबाबत सामाजिक शास्त्रातील व वाणिज्य विषयातील शिक्षकांनी अद्ययावत ठेवले पाहिजे. प्रा. पी. एस. पाटील म्हणाले, युवकांच्या प्रज्ञेची मशागत करण्यासाठी व क्षमता विकसित करण्यासाठी असे प्रशिक्षण शिक्षकांना दिले पाहिजे. त्यातूनच नवोपक्रम व संशोधन उदयास येते आणि समस्या सोडविण्यास उपयुक्त ठरते. अध्यक्षीय भाषण करताना डॉ. श्रीकृष्ण महाजन म्हणाले, बहुआयामी विषयांचा अभ्यास संशोधनाच्या माध्यमातून करण्यासाठी वाणिज्य, व्यवस्थापन व इतर शिक्षकांच्या क्षमता विकसित करण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले जात आहेत. सामाजिक व आर्थिक समस्या सोडविण्यासाठी व निरंतर विकास ध्येयांची प्राप्ती करण्यासाठी अशा बहुआयामी संशोधनाचा वापर केला पाहिजे.

याप्रसंगी स्वागत व प्रास्ताविक डॉ. ए. एम. गुरव यांनी केले, तर डॉ. केदार मारूलकर यांनी आभार मानले.

पुढारी

# अर्थव्यवस्थेला गती देणारे बहुआयामी संशोधन आवश्यक

## कुलगुरू डॉ. शिर्के; वाणिज्य विभागात लघुकालिक कार्यक्रम

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

संशोधन आराखडा व विदासंकलन हे संशोधनाचे हृदय असते. तंत्रज्ञानाचा वापर करण्याबाबत सामाजिक शास्त्रातील व वाणिज्य विषयातील शिक्षकांनी अद्ययावत ठेवले पाहिजे. नव्या जगात आता भारतीय अर्थव्यवस्थेला गती देणारे बहुआयामी संशोधन आवश्यक आहे, असे प्रतिपादन कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागाच्या वतीने लघुकालिक कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन होते.

प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील उपस्थित होते. प्रा. पाटील म्हणाले, युवकांच्या प्रज्ञेची मशागत करण्यासाठी व क्षमता विकसित करण्यासाठी असे प्रशिक्षण शिक्षकांना दिले पाहिजे. त्यातूनच नवोपक्रम व संशोधन उदयास येते आणि समस्या सोडविण्यास उपयुक्त ठरते.

अध्यक्षीय भाषणात प्रा. महाजन म्हणाले, बहुआयामी विषयांचा अभ्यास संशोधनाच्या माध्यमातून करण्यासाठी वाणिज्य, व्यवस्थापन व इतर शिक्षकांच्या क्षमता विकसित करण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले जात आहेत. सामाजिक व आर्थिक समस्या सोडविण्यासाठी व निरंतर विकास ध्येयाच्या प्राप्तीसाठी अशा बहुआयामी संशोधनाचा वापर केला पाहिजे. प्रास्ताविक डॉ. ए. एम. गुरव यांनी केले. डॉ. केदार मारुलकर यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
0 9 FEB 2022 क्रांतीसिंह शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठ जिल्हा ग्रीन चँपियन पुरस्काराचे मानकरी

कोल्हापूर(प्रतिनिधी):- येथील शिवाजी विद्यापीठ सन २०२१-२२साठीचा कोल्हापूर जिल्हा ग्रीन चँपियन पुरस्काराचे मानकरी ठरले आहे. केंद्रीय उच्च शिक्षण मंत्रालयांतर्गत असलेल्या महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण शिक्षण परिषदेमार्फत सदर स्पर्धा घेण्यात आली. ही माहिती परिषदेचे चेअरमन डॉ. डब्ल्यू. जी. प्रसन्न कुमार यांनी ई-मेलद्वारे विद्यापीठ प्रशासनाला दिली आहे. केंद्र सरकारच्या महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण शिक्षण परिषदेमार्फत दर वर्षी स्वच्छ कॅम्पस इन्स्टिटयूशनल पुरस्कार प्रदान करण्यात येतात. याअंतर्गत जिल्हा स्तरापासून ते केंद्रीय स्तरापर्यंत विविध शैक्षणिक संस्थांच्या परिसराची स्वच्छता आणि हरितपणा या मूलभूत निकषांवर निवड करून त्यांना पुरस्कार प्रदान करून प्रोत्साहित करण्यात येते. शिवाजी विद्यापीठाने यंदा प्रथमच या स्पर्धेत सहभाग नोंदविला आणि गेल्या काही वर्षांत जलव्यवस्थापन आणि पर्यावरण संवर्धनाच्या क्षेत्रात केलेल्या कामाच्या बळावर जिल्हा स्तरावर प्रथम पुरस्कार प्राप्त केला आहे.

सदर पुरस्कारासाठीच्या प्रमुख निकषांमध्ये जल व्यवस्थापन, सौर ऊर्जा वापर व ऊर्जा संवर्धन उपक्रम, हरित क्षेत्र व्यवस्थापन, घनकचरा



व्यवस्थापन आणि भू-वापर व व्यवस्थापन यांचा समावेश होता. या संदर्भात अधिक माहिती देताना प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे म्हणाले, शिवाजी विद्यापीठाने गेल्या काही वर्षांत राबविलेल्या जल व्यवस्थापन अभियानामुळे विद्यापीठ परिसर पाणी वापराच्या बाबतीत स्वयंपूर्ण झालेला आहे. दर मोसमात विद्यापीठ साधारण ३१ कोटी लीटर पाण्याचे संवर्धन करते. त्याचबरोबर दररोज ४ लाख लीटर सांडपाण्यावर पुनर्प्रक्रिया करून ते उद्यानांसाठी वापरले जाते.सौरऊर्जेचा वापरही विद्यापीठ टप्प्याटप्प्याने वाढवित आहे. सध्या एकूण वीज वापरापैकी १६ टक्के वीज ही सौर ऊर्जेपासून मिळविली जाते. विद्यापीठाने आपल्या ८५३ एकर क्षेत्रावर वृक्ष लागवड मोठ्या प्रमाणात केली आहे. विद्यापीठ परिसरात विविध प्रजातींची १३ हजारांहून अधिक वृक्ष आहेत. यामुळे हा परिसर कोल्हापूर नगरीचे फुफ्फुस म्हणून ओळखला जातो. गत वर्षी विद्यापीठाने १२०० रोपांची लागवड केली आहे. मियावाकी जंगल क्षेत्र विकसित करण्याचा प्रकल्प विद्यापीठ राबविते आहे. विद्यापीठ दररोज सरासरी ५७५ किलो घनकचऱ्याचे व्यवस्थापन यशस्वीरित्या करते. जैववैद्यकीय घनकचऱ्याचे व्यवस्थापनही विहीत निकषांनुसार केले जाते. पर्यावरण संवर्धनासाठी हरित विकास हा मूलमंत्र घेऊन विद्यापीठ वाटचाल करत आहे. या बळावरच विद्यापीठाला हे यश लाभले आहे.

**ग्रीन प्रॅक्टीसेसमध्ये सर्वच घटकांचे योगदान मोलाचे: कुलगुरू डॉ. शिर्के :-** शिवाजी विद्यापीठाने जलसंवर्धनासह पर्यावरणपूरक संवर्धनशील हरित विकासावर लक्ष केंद्रित केले आहे. यामध्ये विद्यापीठाचा अभियांत्रिकी व उद्यान विभाग देत असलेले योगदान लक्षणीय आहे. त्याचबरोबर परिसराच्या स्वच्छतेसह ग्रीन प्रॅक्टीसेस राबविण्याच्या बाबतीत येथे येणारे कर्मचारी, शिक्षक, विद्यार्थी आणि फिरावयास येणारे नागरिक हे सर्वच घटक अत्यंत सजग आणि दक्ष आहेत. या सर्वांमुळेच विद्यापीठ परिसराची हिरवाई आणि प्रेक्षणीयता अबाधित आहे. जिल्हा स्तरावर प्राप्त पुरस्कारासाठी या सर्वच घटकांचे अभिनंदन! या पुढील काळातही अशीच संवर्धनशील कामगिरी करीत राहण्याची प्रेरणाही या सर्वांना मिळाली आहे, अशी प्रतिक्रिया विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांनी व्यक्त केली.


0 9 FEB 2022 क्रांतीसिंह
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाच्या डॉ. सरवदेंच्या बोलीविज्ञानला महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार

कोल्हापूर(प्रतिनिधी):- शिवाजी विद्यापीठाच्या इंग्रजी अधिविभागातील प्राध्यापक डॉ. औदुंबर सरवदे यांच्या बोली विज्ञान या पुस्तकाला यंदाचा महाराष्ट्र शासनाचा नरहर कुरुंदकर वाङ्‌मय पुरस्कार जाहीर झाला आहे.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्‌मय पुरस्कारांची घोषणा आज करण्यात आली. त्यामध्ये प्रौढ वाङ्‌मय- भाषाशास्त्र/ व्याकरण या साहित्य प्रकारासाठीचा १ लाख रुपयांचा नरहर कुरुंदकर पुरस्कार बोलीविज्ञान पुस्तकाला जाहीर झाला. कोल्हापूरच्या भाषा विकास संशोधन संस्थेतर्फे हे पुस्तक प्रकाशित करण्यात आले आहे.

पुरस्कारासंदर्भात आपल्या भावना व्यक्त करताना डॉ. औदुंबर सरवदे म्हणाले की, पहिल्याच पुस्तकाला थेट महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार लाभणे,ही बाब अतिशय आनंद देणारी आहे. भाषाविज्ञाना सारखा गहन विषय सोपा करून सांगण्याचा प्रयत्न या पुस्तकाद्वारे केला. हे प्रयत्न



यशस्वी झाल्याची पोचपावती पुरस्कारामुळे मिळाली. या पुढील काळातही अशा प्रकारे दर्जेदार संशोधन व लेखन करण्यासाठीची प्रेरणा या पुरस्काराने दिली आहे.

या पुरस्काराबद्दल शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील,प्रभारी कुल सचिव डॉ.व्ही.एन. शिंदे,मराठी अधिविभाग प्रमुख डॉ. रणधीर शिंदे, डॉ.नंदकुमार मोरे यांनी डॉ. सरवदे यांचे अभिनंदन केले आहे.

बोलीविज्ञान या पुस्तकाविषयी...बोली अभ्यासाला सुमारे दीडशे वर्षांची दीर्घ परंपरा आहे. जगभरात झालेल्या बोलीअभ्यासामुळे आणि या अभ्यासातून पुढे येत गेलेल्या निष्कर्षांमुळे भाषा अभ्यासाचा विकास झालेला दिसतो. तथापि, बोली अभ्यासाची वाटचाल सांगणारे पुस्तक मराठीत नव्हते. ही उणीव बोलीविज्ञान या पुस्तकाने भरून काढली आहे. बोली अभ्यासाच्या प्रारंभापासून आजपर्यंतची सारी स्थित्यंतरे या पुस्तकातून सांगितलेली आहेत. काळानुसार बोलीअभ्यासात परिवर्तन झाले. हे परिवर्तन बोली अभ्या साची बदलत गेलेली उद्दिष्टे अधोरेखित करते. या उद्दिष्टां नुसार झालेला अभ्यास प्रस्तुत पुस्तकातून वाचकांसमोर येतो.

बोलींच्या मराठीतील अभ्यासाची स्थिती पाहता, बोलीविज्ञानातील स्थित्यंतरे अभ्यासकांना अपरिचित आहेत. त्यासाठी अभ्यासकांनी बोली विज्ञान समजून घेणे महत्त्वाचे आहे. हे समजून घेणे समग्र भाषा विज्ञानाच्या आकलनासाठीही आवश्यक आहे.कारण, भाषा विज्ञान आणि बोलीविज्ञानाचा विकास परस्पर समन्वयाने झाला असून तो एकत्रित अभ्यासणे उद्बोधक ठरेल. हा विकास या पुस्तकात नेमकेपणाने सांगि तला गेला आहे. या पुस्तकाद्वारे मराठी भाषा व तिच्या विविध बोलींचा अभ्यास करणाऱ्या अभ्यासकांना नवी दिशा देण्याचा प्रयत्न केला.

0 9 FEB 2022 पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डिजिटल मीडियासाठी मल्टिटास्किंग व्हा : गरूड

## जर्नालिझम विभाग, मास कम्युनिकेशन विभागातर्फे कार्यशाळा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

नवीन डिजिटल माध्यमांमुळे आशय निर्मितीमध्ये मोठी संधी निर्माण झाली आहे. त्यामुळे आशय निर्मितीसाठी नव्या तंत्रज्ञानातील बदल अंगीकारणे गरजेचे आहे, याकरिता माध्यमांमध्ये मल्टिटास्किंग असणे गरजेचे आहे, असे मत डिजिटल माध्यम तज्ज्ञ विश्वनाथ गरूड यांनी व्यक्त केले.



शिवाजी विद्यापीठातून

शिवाजी विद्यापीठाच्या जर्नालिझम विभाग व मास कम्युनिकेशन विभागातर्फे आयोजित 'डिजिटल मीडिया व डिजिटल जाहिरात' या विषयावरील एक दिवसीय राज्यस्तरीय ऑनलाईन कार्यशाळेच्या उद्घाटन सत्रात ते बोलत होते. गरूड म्हणाले, तंत्रज्ञानामुळे पत्रकारितेपुढे आव्हाने निर्माण झाली आहेत; परंतु त्यामुळे संधी उपलब्ध झाल्या आहेत. याप्रसंगी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संज्ञापन आणि वृत्तपत्र विद्या विभागाचे सहायक प्रा. योगेश बोराटे यांनी पत्रकारितेतील नव्या प्रवाहाविषयी मार्गदर्शन केले.

ते म्हणाले, डिजिटल माध्यामाकडून मोठ्या प्रमाणात आशाय आपल्याला मिळतो. परंतु, नजीकच्या काळात या आशयाची गुणवत्ता, दर्जा यावर त्या आशयाचे महत्त्व ठरेल.

लक्ष मीडियाच्या व्यवस्थापक निहारिका महात्मे यांनी डिजिटल जाहिरातीसंदर्भात मार्गदर्शन केले. त्यांनी आऊटडोअर जाहिरात माध्यमे व त्या माध्यमातील नवीन प्रवाह आणि त्यासासाठी सर्जनशीलतेचा वापर करून जाहिरात कशी करावी, याविषयी मार्गदर्शन केले. व्हिज्युव्हल आर्टिस्ट मयूर कुलकर्णी यांनी जाहिरातीसाठी असणारा ग्राहक वर्ग लक्षात घेऊन जाहिरात करणे आवशक असल्याचे सांगितले. अश्वमेध मीडियाचे सुशांत उपाध्ये यांनी स्थानिक जाहिराती, जाहिरात निर्मितीमध्ये असलेल्या संधी याविषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सुमेधा साळुंखे, विनायक राज्याध्यक्ष यांनी केले.

विभागप्रमुख डॉ. निशा मुडे-पवार यांनी प्रस्ताविक केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी चंद्रशेखर वानखेडे, अनुराधा इनामदार यांनी सहकार्य केले. यावेळी सहायक प्रा. डॉ. शिवाजी जाधव, संजय घोडावत विद्यापीठाच्या मास कम्युनिकेशन विभागाचे जयप्रकाश पाटील, परशुराम पवार, मास कम्युनिकेशन विभाग, सोलापूर विद्यापीठातील तेजस्विनी कांबळे, वारणा महाविद्यालय ऐतवडे खुर्द येथील आनंद पांढरबळे उपस्थित होते.

09 FEB 2022
पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डिजिटल मीडियासाठी मल्टिटास्किंग व्हा

## विश्वनाथ गरुड : 'डिजिटल मीडिया आणि डिजिटल जाहिरात' विषयावर कार्यशाळा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

नवीन डिजिटल माध्यमांमुळे आशय निर्मितीमध्ये मोठी संधी निर्माण झाली आहे. त्यामुळे आशय निर्मितीसाठी नव्या तंत्रज्ञानातील बदल अंगीकारणे गरजेचे आहे. याकरिता माध्यमांमध्ये मल्टिटास्किंग असणे गरजेचे आहे, असे मत डिजिटल माध्यम तज्ज्ञ विश्वनाथ गरुड यांनी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठाचा जर्नालिझम विभाग आणि मास कम्युनिकेशन विभागाच्या वतीने आयोजित 'डिजिटल मीडिया आणि डिजिटल जाहिरात' या विषयावरील एकदिवसीय राज्यस्तरीय ऑनलाईन कार्यशाळेच्या उद्घाटन सत्रामध्ये ते बोलत होते.

गरुड म्हणाले, तंत्रज्ञानामुळे पत्रकारितेपुढे आव्हाने निर्माण झाली आहेत. त्याचबरोबर संधीही उपलब्ध झाल्या आहेत.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संज्ञापन आणि वृत्तपत्र विद्या विभागाचे सहायक प्राध्यापक योगेश बोराटे म्हणाले, डिजिटल माध्यामाकडून मोठ्या प्रमाणात आशय आपल्याला मिळतो; परंतु नजीकच्या काळात या आशयाची गुणवत्ता आणि दर्जा यावर त्या आशयाचे महत्त्व ठरेल. ताज्या आशयाला अनुसरून तो ऐकण्यासाठी, पाहण्यासाठी लागणारा वेळ आणि विचारात घेऊन केली जाणारी आशय निर्मिती हे सध्याच्या आणि पुढील कालावधीचे वैशिष्ट्य ठरणार आहे.

लक्ष मीडिया प्रा. लि;च्या व्यवस्थापक निहारिका महात्मे यांनी डिजिटल जाहिरातीसंदर्भात मार्गदर्शन केले. त्यांनी आऊटडोअर जाहिरात माध्यमे आणि त्या माध्यमातील नवीन प्रवाह काय आहेत आणि त्यासाठी कशा स्वरूपामध्ये सर्जनशीलतेचा वापर करून जाहिरात करावी याविषयी मार्गदर्शन केले. व्हिज्युअल आर्टिस्ट मयूर कुलकर्णी यांनी जाहिरातीसाठी असणारा ग्राहकवर्ग लक्षात घेऊन जाहिरात करणे आवश्यक असल्याचे सांगितले. यामध्ये संधी मोठ्या असल्या तरी आशयामध्ये असलेली सर्जनशीलता महत्त्वाची असल्याचे त्यांनी नमूद केले. अश्वमेध मीडियाचे सुशांत उपाध्ये यांनी स्थानिक जाहिराती आणि जाहिरात निर्मितीमध्ये असलेल्या संधी याविषयी मार्गदर्शन केले.

सूत्रसंचालन डॉ. सुमेधा साळुंखे आणि विनायक राज्याध्यक्ष यांनी केले. विभागाच्या प्रमुख डॉ. निशा मुडे-पवार यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी चंद्रशेखर वानखेडे, अनुराधा इनामदार यांनी सहकार्य केले. सहायक प्राध्यापक डॉ. शिवाजी जाधव, संजय घोडावत विद्यापीठाच्या मास कम्युनिकेशन विभागाचे जंयप्रकाश पाटील, परशुराम पवार, सोलापूर विद्यापीठातील तेजस्विनी कांबळे, वारणा महाविद्यालय ऐतवडे खुर्द येथील आनंद पांढरबळे आदींची प्रमुख उपस्थिती होती.



जनसंपर्क कक्ष
09 FEB 2022 पुण्यनगरी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉ. चव्हाण यांना 'सर्ब'चा संशोधन प्रकल्प मंजूर

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या रसायनशास्त्र अधिविभागातील प्रा. डॉ. संजय चव्हाण यांना केंद्र सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालयांतर्गत असलेल्या सायन्स अँड इंजिनिअरिंग रिसर्च बोर्ड (सर्ब) यांच्याकडून ३१ लाख २० हजार रुपयांचा संशोधन प्रकल्प मंजूर झाला आहे. या केंद्रीय मंडळाकडून त्यांना मंजुरीचा ई-मेल प्राप्त झाला आहे.



डॉ. संजय चव्हाण

डॉ. चव्हाण यांनी 'डिझाईन अँड सिंथेसिस ऑफ कार्बन रिच अल्कीनिल फंक्शनलाईज्ड ट्रान्झिशन मेटल कॉम्प्लेक्सेस फॉर देअर लुमिनिसेन्स अँड नॉन लिनिअर ऑप्टिकल प्रॉपर्टीज' या विषयावरील प्रकल्पाचा प्रस्ताव भारत सरकारच्या 'सायन्स अँड इंजिनिअरिंग रिसर्च बोर्ड' यांना सादर केला होता. डॉ. चव्हाण यांनी आजपर्यंत यूजीसी, डीएसटी व सर्ब यांचे पाच विविध संशोधन प्रकल्प पूर्ण केले आहेत. भारत व ऑस्ट्रेलिया यांच्या संयुक्त संशोधन कार्यक्रमांतर्गत ऑस्ट्रेलिया-इंडिया स्ट्रॅटेजिक रिसर्च फंडअंतर्गत प्रख्यात ऑस्ट्रेलियन शास्त्रज्ञांसह रामन रिसर्च इन्स्टिट्यूट, बंगलोर आणि हैदराबाद केंद्रीय विद्यापीठातील शास्त्रज्ञांसमवेतही विविध संशोधन प्रकल्पांवर काम केले आहे.